तार 'EDUTECH'

दूरध्वनी : २६२ ०६०१-०३-०७
२६२ १७२६ (सं)
२६२ ०००५
टेलेक्स : ११८२४९७ बीटीईन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१

क्रमांक : २/एनजीपी/१०९३/२५६२
दिनांक : 23 DEC 1993

प्रति,

सचिव,
नंदुरबार तालुका विधायक समितीचे
गजमल तुळशीदास पाटील कॉलेज,
नंदुरबार,
जि. -धुळे.

विषय : औषध निर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी.

संदर्भ : शासनाचे उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवा योजन विभागाचे पत्र क्रमांक : पीसीआय/३०९३/(२७७६)/टीई-२, दिनांक ५/११/९३.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, शासनाने शासनाच्या संदर्भाधीन पत्रान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष १९९३-९४ पासून विना अनुदान तत्वावर औषध निर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रम खालील अटींच्या अधिन राहून ४० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यांस परवानगी दिलेली आहे. -

१) शासन निर्णय, शिक्षण आणि सेवा योजन विभाग क्रमांक : टीईएम/३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१, दिनांक ३१/५/१९८३ अन्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मार्गदर्शक तत्वे बंधनकारक राहतील.

२) संस्थेचे नियामक मंडळ स्थापन करुन सदर मंडळाच्या अध्यक्षांची नेमणूक अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानके व प्रमाणकानुसार करण्यांत यावी.

३) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने/शासनाने/संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व तंत्र शिक्षण परिक्षा मंडळ, मुंबई ५१ यांनी

/ २ /

विहीत केलेल्या मानकां व प्रमाणकांनुसार आवश्यक त्या शैक्षणिक सुविधा, साधनसामग्री, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, तसेच जागेबाबतची तरतूद करणे आवश्यक आहे.

४] अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क शासन नियमानुसार ठरविण्यात यावे.

५] अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या क्र. एफ-२०-२५/९१-ए. आय. सी. टी. ई. /८८९७, दिनांक १६/११/९३ च्या मंजूरी पत्रात विहीत केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.

६] संस्था चालक व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त खाते संस्थेने सदर अभ्यासक्रमाकरिता इंदिरा महिला सहकारी बँक, नंदूरबार येथे पावती क्र. ३४३९, दि. १/१२/९३ अन्वये रुपये २,00,000/- [रुपये दोन लाख] जमा केलेले आहेत.

७] शासनाने/अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहीत केलेल्या सर्व अटी मान्य असल्याबाबतचा करारनामा आपणांस करावा लागेल.

८] शासनाने, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई ५१ यांनी मान्य केलेल्या प्रवेश नियमांनुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

९] प्रवेश देतांना विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारच्या देणग्या स्वीकारू नयेत.

आपला विश्वासू,

[ भा. बा. चोपणे ]
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई १.

DEPUTY DIRECTOR,
Technical Education, Regional Office, Nasik,
Nasik – Road.

N.T.V.S.s Institute of Pharmacy DTE 5272 Nandurbar

PRINCIPAL
N. T. V S'S
Institute of Pharmacy
Nandurbar - 425412

PRINCIPAL
N.T.V.Samiti's
Institute of Pharmacy
Nandurbar (M.S)

PRINCIPAL
N.T.V.Samiti's
Institute of Pharmacy
Nandurbar (M.S)

Principal
N.T.V. Samiti's
Institute Of Pharmacy
Nandurbar (M.S.)